दैनिक

वृत्तपत्र नव्हे एक चळवळ

# कृषीवल

रायगड, मुंबई, ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यातून प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

अलिबाग, मुंबई, ठाणे, रत्नागिरी
रविवार, दिनांक ४ एप्रिल २०१०
अंक : २९६, पृष्ठे : ८ + ४ वर्ष : ७३ वे
किंमत : अडीच रुपये

# निसर्गाचा सहज सुंदर आविष्कार 'सलील फार्म'



आस्वाद

अभय आपटे

**नागावमध्ये येणे शक्य नसल्याने व पर्यटकांचा वाढता ओघ पाहता शशिकांत भाऊंनी पर्यटन विकास महामंडळातर्फे न्याहरी-निवास योजनेंतर्गत सलील फार्म पर्यटकांसाठी उघडले आहे. निसर्गाचा सहज सुंदर आविष्कार म्हणजेच 'सलील फार्म'चा परिचय यावेळच्या आस्वादमध्ये आपण पाहणार आहोत.**

मूळ रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील नांदवी भागातील गावाचे रहिवासी शशिकांत म्हामूणकर व्यवसायाने मुंबईत स्थायिक झाले, त्यांच्या धर्मपत्नीचे माहेर अलिबाग किनारपट्टीवरील असल्याने वारंवार अलिबागला येणे व्हायचे. शशिकांत भाऊंना निसर्गाबद्दल विलक्षण वेड असल्याने व मुंबईला अलिबाग जवळ असल्याने महाडला दोन दिवस जायचे झाले तर प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणावर फुकट जातो. या कारणाने किहीमपासून रेवदंडा गावच्या टोकापर्यंत छोटीशी जागा वाडी घेण्याचा विचार केल्यानंतर नागावमधील ग्रामपंचायत सदस्य विकास पिंपळे हे शशिकांत भाऊंचे खास मित्र तर रेवदंड्यातील सामाजिक कार्यकर्ते बन्सीधर रेळे यांच्या मदतीने नागाव-हटाळेमधील कवळे पारोडा येथे सुमारे सहा गुंठे क्षेत्रफळाची जागा घेतली व तेथे घर बांधले. पण घर बांधूनही सातत्याने नागावमध्ये येणे शक्य नसल्याने व पर्यटकांचा वाढता ओघ पाहता शशिकांत भाऊंनी पर्यटन विकास महामंडळातर्फे न्याहरी-निवास योजनेंतर्गत सलील फार्म पर्यटकांसाठी उघडले आहे. निसर्गाचा सहज सुंदर आविष्कार म्हणजेच 'सलील फार्म'चा परिचय यावेळच्या आस्वादमध्ये आपण पाहणार आहोत. दर्शनी भागातच पार्किंग, दुतर्फा लॉन मध्यभागी राहण्यासाठी बंगला माग़ील बाजूस झापांची झोपडी, हॅमॉक, लहान मुलांसाठी पोहण्याचा तलाव, टेबल-खुर्ची जेवणाची व्यवस्था, चोवीस तास पाणी, कॅरम, बॅडमिंटन, क्रिकेट मुलांसाठी खेळ, साहित्य, समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेल्यावर ज्येष्ठांसाठी उन्हात बसण्याऐवजी सावलीसाठी छत्रीची व्यवस्था तर मांडवा जेट्टी, अलिबागपर्यंत पर्यटक आल्यावर पिकअप करण्याची सोय अशी व्यवस्था या फार्ममध्ये आहे.

तीन खोल्या व एक हॉल असे निवास व्यवस्थेचे स्वरुप असून सहा व्यक्तीसाठी सुमारे दोन हजार रुपये फक्त राहण्याचे घेतले जातात. याठिकाणी फॅमिली ग्रुप यांची पसंती मोठ्या प्रमाणावर असते. मुंबईतील प्रसिद्ध रुग्णालयाचा ग्रुप, ऑर्केस्ट्रातील कलाकार, परदेशी पर्यटकांची पसंती सलील फार्मला असते. भोजन शाकाहारी व मांसाहारी असे दोन्ही उपलब्ध आहे. शाकाहारी नाश्तात कांदे-पोहे, उपमा, घावन, आंबोळ्या २० ते २५ रुपयांच्यात उपलब्ध होतात तर भोजनात चपाती किंवा भाकरी, कोशिंबीर, ताक, दोन भाज्या अशी थाळी ६० रुपयांच्यात गोड पदार्थ घेतल्यास ऐंशी रुपयांमध्ये थाळी मिळते. त्यात मोदकांना मागणी जास्त असते. पुरणपोळी, खीर, गुलाबजाम असे पदार्थ मिळू शकतात. मांसाहारी नाश्तात आमलेट पाव, बुरजी पाव वीस रुपयांच्यात मिळू शकतो तर मटण १२० रु., चिकन ९० रुपयांच्यात मिळते. मांसाहारी डिशमध्ये सोलकढी व भाकरीला प्राधान्य असते. ताजी मच्छी पापलेट, कोलंबी, सुरमई उपलब्ध असल्यास दिली जाते. त्या थाळीचे भाव ताजे मासे ज्या दराने मिळतील त्याप्रमाणे घेतले जातात. दुसरी एक सुविधा पर्यटकांना मिळते ती म्हणजे पर्यटकांनी त्यांच्या आवडीनुसार मासे आणल्यास फक्त तयार करुन देण्याचा खर्च थाळीला आकारला जातो.

शांत परिसर, पाच मिनिटाच्या अंतरावर मुख्य रस्ता, रुचकर भोजन अशा फार्ममध्ये बुकींगसाठी ९८२०१२८८८७ या भ्रमणध्वनीवर किंवा ०२२-२२९५३६२७ या दूरध्वनीवर संपर्क साधता येतो. www. Salifarm.com या वेबसाईटवर फार्मची माहिती उपलब्ध आहे.



